# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 13/06/2020 (शनिवार)

(दुपार)

### दुखापत

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 5 कि. मी अंतरावर वाढोणा येथे दिनांक 12/06/2020 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण घनशाम पडोलिया, वय 27 वर्ष, रा. वाढोणा याचे शेताचे धुऱ्यावरील गोटे आरोपी नामे– मोहन रामप्रसाद पडोलिया रा. वाढोणा याने उचलुन फेकले व त्याचे शेताचे हददीत खंब्बे गाडले फिर्यादीने आरोपीस हटकले. याकारणावरून आरोपीने फिर्यादीला कुऱ्हाडीच्या लाकडी दांडयाने छातीला मारले व फिर्यादीचे आईला पण शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार लांडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा घोगली वार्ड क्र. 1 येथे दिनांक 11/06/2020 चे 22:30 वा. दरम्यान आरोपी नामे– दिनेश देवराव तागडे, रा. घोगली हा दारू पिवुन गावात शिवीगाळ करीत असतांना फिर्यादींची आई यांनी त्यास हटकले. याकारणावरून आरोपीने फिर्यादीच्या आईला शिवीगाळ केली व रस्त्यातील काडीने फिर्यादींच्या आईच्या उजव्या हातावर मारली. तसेच किशोर तागडे हे समजाविण्यास गेले असता आरोपीने त्यांचे डोक्याच्या कपाळावर काचेची देशी दारूची बॉटल मारली त्यामुळे ते जखमी झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज बाबुलाल बांगडे, वय 32 वर्ष, रा. घोगली वार्ड क्र. 1 यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ वानखेडे 9850492064 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर